# बृहन्मुंबई महानगरपालिका
## प्रबोधनकार के.सि. ठाकरे नाट्यमंदिर

1. **<u>संस्थेबाबतची माहिती, कार्ये व कर्तव्ये</u>**

मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 63 (ड) च्या तरतुदीनुसार करमणुकीची सुविधा पुरविणे हे महापालिकेचे स्वविवेकाधिन कर्तव्य आहे. तदुनसार, प्रबोधनकार के. सि. ठाकरे नाट्यमंदिर नागरिकांना करमणुकीची सुविधा देत आहे.

प्रबोधनकार के.सि. ठाकरे नाट्यमंदिर संकुल हे सोडावाला लेन, बोरीवली (पश्चिम), मुंबई - 400 092 येथे आहे. संकुलाचे क्षेत्रफळ 8843 चौ.मी. आहे आणि इमारतीचे क्षेत्रफळ 8756 चौ.मी. आहे.

संकुलामध्ये खालील उपक्रम आहेत :

1) मुख्य सभागृह (1026 आसने), (क्षेत्रफळ 3260 चौ.मी.)
2) लघु नाट्यगृह (211 आसने), (471 चौ.मी.)
3) कला दालन (431 चौ.मी.)
4) परिषद सभागृह (226 चौ.मी.)
5) समाजमंदिर (468 चौ.मी.)
6) बहुद्देशीय सभागृह क्र.1 (328 चौ.मी.)
7) बहुद्देशीय सभागृह क्र.2 (328 चौ.मी.)
8) तालिमकक्ष
9) निवासी खोल्या (कलाकारांना रहाण्यासाठी)
10) वाहनतळ
11) वाचनालय / ग्रंथालय (344 चौ.मी.)
12) अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद बोरीवली शाखेचे कार्यालय
13) दि म्युन्सिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,बोरिवली शाखा
14) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, बोरिवली शाखा (49.29 चौ. मी)
15) लघु कक्ष (37.76 चौ. मी)

मुख्य नाटयगृह आणि लघु नाटयगृह वातानुकुलित असून इलेक्ट्रॉनिक्स डिमर, टेलिक्लाइंबर, टेलिस्कोप ह्या अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्स यंत्रणेने आणि 1000 वॅट क्षमतेचे स्पॉट, सायक्लॉन, टी.सी. स्पॉट, फालो या प्रकारच्या विद्युत दिव्यांनी सुसज्ज आहेत. मुख्य सभागहात बालकांसह येणा-या स्त्री प्रेक्षकांसाठी क्रायरुमचीही सुविधा आहे. नाटयगृहामधे प्रेक्षकांकरिता उपहारकट्ट्याची सुविधा उपलब्ध आहे.

रिलायन्स कंपनीचा विद्युत पुरवठा काही कारणास्तव खंडीत झाल्यास विद्युत पुरवठा करण्यासाठी डिझेलवर चालणारे विद्युत जनित्र आहे.

लग्न, बैठका, सेमिनार इत्यादी कार्यक्रमासाठी बहुउद्देशीय सभागृहे व समाज मंदिर देण्यात येतात. तालिम, सभा, कार्यशाळा इ. कार्यक्रमासाठी लघु कक्ष देण्यात येतो. कलादालन (फक्त कलाप्रदर्शनासाठी) व घडीच्या पार्टीशन्सची सोय असलेले वातानुकुलित परिषद सभागृह इतर प्रदर्शने व विक्रीसाठी उपलब्ध आहे.

मुख्य नाट्यगृह, लघु नाट्यगृह, तालिम कक्ष, समाज मंदिर व बहुउद्देशीय सभागृहे, परिषद सभागृह, कलादालन यांचे व्यवस्थापन व आरक्षण महानगरपालिकेकडे आहे.

बोरीवली सांस्कृतिक केंद्रामार्फत चालविण्यात येणाऱ्या अत्याधुनिक सुविधायुक्त ग्रंथालयासाठी , अखिल भारतीय नाट्य परिषद बोरीवली यांना कार्यालया साठी व म्युनिसिपल को. ऑपरेटिव्ह बँकेच्या बोरीवली शाखेसाठी संकुलातील जागा भाडे तत्वावर देण्यात आलेल्या आहेत. मंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची बोरिवली शाखा तात्पुरत्या कालावधीसाठी या संकुलात स्थानांतरीत करण्यात आली आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या बोरिवली शाखेमार्फत नृत्य, नाट्य, संगित इ. प्रशिक्षण वर्ग व शिबिरे आयोजित केली जातात.

नाट्यगृहात येणा-या प्रेक्षकांकरिता उपहारकट्टे, संकुलामध्ये अभ्यागतांकरीता सुमारे 100 चारचाकी वाहने ठेवण्याची क्षमता असलेला सशुल्क वाहनतळ या सेवा कंत्राटदाराकडे संमती-नि-परवानगी तत्वावर चालविण्यासाठी देण्यात आलेल्या आहेत.

संकुलामध्ये अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणा स्थापित केली आहे. या यंत्रणेत स्प्रिंकलर्स, फायर एक्स्टींग्वीशर्स, धुरशोधक आणि विद्युत तसेच डिझेलवर चालणारे पंप आहेत.

संकुलात सुरक्षा उपाय योजना म्हणून एक्स-रे बॅगेज मशिन, डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर,48 सी.सी टि.व्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. संपूर्ण संकुलासाठी महानगरपालिका सुरक्षा रक्षकांव्यतिरिक्त 20 खाजगी सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत.

**<u>सेवा प्रदान करण्याकरिता व तक्रार निवारणार्थ उपलब्ध असलेले कार्यतंत्र</u>**

नाटयमंदिर संकुलाच्या प्रशासकीय कार्यालयात तक्रार नोंदवही उपलब्ध आहे.

नाटयगृह प्रभावीपणे कार्यरत राहण्याकरिता प्रेक्षकांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करून बृहन्मुंबई महानगरपालिका/नाटयगृह प्रशासन यांना सहकार्य करावे अशी अपेक्षा आहे. नाट्यगृहाच्या सुरक्षिततेसाठी, प्रेक्षकांनी पिशव्या इत्यादी सामान नाट्यगृहात आणू नये, त्यांनी प्रेक्षागृहात खाद्यपदार्थ नेऊ नयेत तसेच, त्यांनी नाट्यमंदिर संकुलात स्वच्छता राखावी.

**<u>संस्थात्मक संरचना</u>**

महापालिका आयुक्त

अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे)

उप आयुक्त (आ. व्य.)

प्रशासकीय अधिकारी

सहा. व्यवस्थापक

लिपिक